॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
मैत्री म्हणजे समानता

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १७ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३६० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# महाराष्ट्रात ओला, उबर, रॅपिडो होणार बंद


## सरकारने दिली 'ॲपल' व 'गुगल'ला ताकीद!

● **मुंबई । वीरभूमी –**
महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे धावणाऱ्या बाईक टॅक्सी सेवांविरोधात राज्य सरकारने आतापर्यंतची सर्वांत मोठी आणि धडक कारवाई सुरू केली आहे. राज्यातील ओला, उबर आणि रॅपिडो या नामांकित कंपन्यांची मोबाईल ॲप्स गुगल प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअरवरून त्वरित हटवण्याचे आदेश महाराष्ट्र सायबर विभागाने दिले आहेत.

वारंवार दिलेल्या इशा-यांकडे दुर्लक्ष करणे, राज्याच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे उल्लंघन करणे आणि प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड करणे या कारणांमुळे राज्य सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र सायबर विभागाच्या या कारवाईमुळे डिजिटल वाहतूक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र सायबर विभागाचे अप्पर पोलिस महासंचालक यांच्या कार्यालयाकडून १५ मे रोजी गुगल आणि ॲपल कंपन्यांना अधिकृत नोटीस पाठवण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार या कंपन्यांना उबर, ओला आणि रॅपिडो ॲप्स ब्लॉक करण्याचे आणि त्यांचा ॲक्सेस बंद करण्याचे थेट निर्देश देण्यात आले आहेत.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १२ मे रोजी सायबर विभागाला एक पत्र लिहून बेकायदेशीर बाईक टॅक्सींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर सायबर विभागाने अवघ्या तीन दिवसांत ही मोठी कारवाई केली आहे.




गुगल आणि ॲपलला पाठवलेल्या नोटीसमध्ये सायबर विभागाने स्पष्ट केले आहे की, या ॲप्सद्वारे चालवली जाणारी बाईक टॅक्सी सेवा पूर्णपणे बेकायदेशीर असून ती सध्याच्या कायदेशीर चौकटीत बसत नाही. परिवहन विभागाची कोणतीही वैध परवानगी, सरकारी मंजुरी किंवा मोटार वाहन कायद्यातील नियमांचे पालन न करताच ही प्रवासी वाहतूक सर्रास सुरू आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्रवाशांच्या विशेषत: महिलांच्या सुरक्षेबाबत या ॲप्समध्ये गंभीर त्रुटी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. चालकांची पडताळणी, विमा कवच आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत सुमार दर्जाची असल्याचे सरकारने म्हटले आहे.

नुकतीच या बाईक टॅक्सी प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. याप्रकरणी फौजदारी गुन्हाही दाखल झाला आहे. महाराष्ट्रात अशा अनेक तक्रारी वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांत नोंदवल्या गेल्याचे या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या आदेशांचे पालन न केल्यास गुगल आणि ॲपलवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

बाईक टॅक्सी चालकांशी संबंधित अलीकडील तक्रारींचा संदर्भ देत, ज्यात एका महिला प्रवाशाच्या कथित गैरवर्तनाचे प्रकरण आणि पोलिस ठाण्यांमधील अनेक तक्रारींचा समावेश आहे, ते म्हणाले की, "रोजगारापेक्षा महिलांची सुरक्षा अधिक महत्त्वाची आहे," आणि सरकारचे प्राधान्य स्पष्ट आहे.

प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारचा बाईक टॅक्सी या संकल्पनेला विरोध नाही. परंतु, सरकारने केवळ 'इलेक्ट्रिक बाईक टॅक्सी' चालवण्यास तात्पुरती परवानगी दिली होती, जेणेकरून प्रदूषण कमी होईल. या कंपन्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. परंतु, ओला, उबर आणि रॅपिडो या कंपन्यांनी अद्याप एकही कागदपत्र सादर केलेले नाही. उलट, नियमांचे उल्लंघन करत हजारो पेट्रोलवर चालणा-या दुचाकी रस्त्यावर उतरवून बेकायदेशीर व्यवसाय सुरू ठेवला आहे, असा आरोप सरनाईक यांनी केला.

### परिवहन मंत्र्यांचे सायबर विभागामार्फत पत्र

■ महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १२ मे रोजी सायबर विभागाला पत्र पाठवून राज्यात कार्यरत असलेल्या बाईक टॅक्सी प्लॅटफॉर्म्सविरुद्ध हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. आम्ही महाराष्ट्र सायबर विभागामार्फत या ॲप्ससंदर्भात गुगल आणि ॲपलला पत्रं पाठवली आहेत. महाराष्ट्रात बाईक टॅक्सी बेकायदेशीरपणे कार्यरत आहेत आणि त्यानुसार कारवाई केली जात आहे, असे सरनाईक म्हणाले.

## SPOT NEWS

### जगात 'इबोला' व्हायरसचा धुमाकूळ; ६५ जणांचा मृत्यू

● **मुंबई** – काही वर्षांपूर्वी जगावर कोरोनाचे मोठे संकट आले होते. कोरोनामुळे अनेकांनी आपला जीव गमावला, जगभरात लाखो लोकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्यानंतर आता आता जगात आणखी एका व्हायरसमुळे हाहाकार उडाला आहे. आफ्रिका खंडातील कांगोमध्ये इबोला व्हायरसने धुमाकूळ घातला आहे. आतापर्यंत २४६ जणांना या आजाराची लागण झाली असून, या आजारामुळे ६५जणांचा मृत्यू झाला आहे. इबोला हा आजार खूप दुर्मिळ आहे. मात्र तेवढाच तो खतरनाक देखील आहे, कारण तो खूप प्रचंड वेगाने पसरतो. इबोला आजारामध्ये मृत्यूचे प्रमाण हे अधिक आहे. हा आजार तरल पदार्थाच्या संपर्कात आल्यास पसरतो जसे की रक्त, रक्तामधून या आजाराचा प्रसार होतो. इबोलावर सध्या तरी कोणताही उपचार तसेच वॅक्सिन उपलब्ध नाही. त्यामुळे व्यक्तीमध्ये जे लक्षणं दिसतात त्यावरूनच डॉक्टर त्याच्यावर उपचार करतात. हा आजार अधिक वेगाने पसरतो त्यामुळे त्याला खूप खतरनाक मानले जाते. त्यामुळे कांगो देशाच्या शेजारी जेवढे देश आहेत, त्या सर्व देशांमध्ये तेथील सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून हाय अलर्ट जारी केला आहे.

### कांद्याच्या दरावरून शेतकऱ्यांचा संताप

● **नाशिक** – राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडले असताना केंद्र सरकारने १२.३५ रुपये प्रति किलो दराने कांदा खरेदीची घोषणा केली आहे. जाहीर केलेला दर अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या रक्ताचे पाणी करून पिकवलेला कांदा रस्त्यावर फेकण्याच्या मन:स्थितीत असतानाच, केंद्र सरकारने मदतीचा हात पुढे केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'फिल्डिंग' नंतर केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी १२.३५ रुपये प्रति किलो दराने कांदा खरेदीची घोषणा केली. मात्र, हा दर म्हणजे शेतकऱ्यांच्या 'जखमेवर मीठ' असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. गेल्या काही दिवसांपासून बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव मातीमोल झाले आहेत. काही ठिकाणी तर १ रुपया किलो दराने कांदा विकण्याची नामुष्की शेतक-यांवर आली.

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांसाठी 'अमृत'चे मोफत ड्रोन प्रशिक्षण अन् अधिकृत परवानाही मिळणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेती, फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा तसेच विविध तांत्रिक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भविष्यातील वाढती गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांसाठी पूर्णपणे मोफत ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अधिकृत ड्रोन पायलट परवानाही प्रदान करण्यात येणार आहे.

'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. प्रशिक्षण कालावधी १० दिवसांचा असून संपूर्ण प्रशिक्षण मोफत दिले जाणार आहे. तसेच प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांच्या राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. पुणे, नाशिक, मुंबई आणि नागपूर येथे प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या प्रशिक्षणानंतर उमेदवारांना अधिकृत ड्रोन पायलट परवाना मिळणार असल्याने शेती, औद्योगिक क्षेत्र, सर्वेक्षण, सुरक्षा सेवा, फोटोग्राफी आदी क्षेत्रांमध्ये करिअरच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत.

इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ न मिळणाऱ्या खुल्या प्रवर्गातील २५ जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. यामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी, भूमिहार आदी जातींचा समावेश आहे. अर्जदाराचे कुटुंबीय वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. उमेदवाराचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे. किमान १२ वी उत्तीर्ण असावा. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.

## सीना नदीतून तातडीने पाणी सोडा

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । शेतकऱ्यांच्या मागणीला तात्काळ प्रतिसाद**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या पाण्याच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन सीना प्रकल्पातून तातडीने पाणी सोडण्याचा निर्णय राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला आहे.



पारनेर तालुक्यातील टंचाई आढावा बैठकीदरम्यान तसेच विविध गावांच्या भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी केलेली मागणी तत्काळ मान्य करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना शनिवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून पाणी सोडण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिले.

पारनेर तालुक्यात टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पाणी उपलब्धतेबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी शेतकरी प्रतिनिधींनी उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे शेतीपिके व पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानुसार सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून आवर्तन क्रमांक २ सोडण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली असून या पाण्यामुळे लाभक्षेत्रातील शेती तसेच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येला मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर धरणातील पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत सुरक्षित ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने वापर करावा. पाण्याचा कोणत्याही प्रकारे अपव्यय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

# आखाती युद्धामुळे सर्वसामान्यांची चहुबाजूंनी आर्थिक कोंडी

## सोने, तेल, दूध महागले

● **मुंबई । वीरभूमी –**
आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता भारताला बसताना पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून कच्च्या तेलाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारात वाढल्याने देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या. सोने, चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ करत १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली. सीएनजीचे दर २ रुपयांनी महागले. अशात आता सर्वसामान्यांच्या दररोजच्या जीवनात महत्त्वाचे असलेल्या दुधाच्या किमतीही वाढणार आहेत. परिणामी चहुबाजूंनी सर्वसामान्यांची आर्थिक कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे.

देशातील आघाडीच्या अमूल आणि मदर डेअरीने दूध दरात वाढ केल्यानंतर आता कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (गोकुळ) देखील आपल्या गायीच्या दूध विक्री दरामध्ये प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही नवीन दरवाढ येत्या २१ मे २०२६ पासून मुंबई, कोल्हापूर, पुणे आणि कोकण




विभागातील सर्व शहरांमध्ये लागू केली जाणार आहे. शनिवारी गोकुळ शिरगाव येथील प्रधान कार्यालयात प्रशासक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत या दरवाढीवर निर्णय घेण्यात आला आहे.

या दरवाढीबाबत गोकुळने दिलेल्या माहितीनुसार, ही दरवाढ प्रामुख्याने गायीच्या दूध प्रकारांसाठी लागू असेल. यामध्ये गायीचे दूध, टोण्ड दूध, गोकुळ शक्ती, स्टँडर्ड दूध या ब्रँडचा समावेश असेल. गोकुळने गायीच्या दुधाच्या किमतीत वाढ केली आहे. मात्र म्हशीच्या दूध विक्री दरामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे म्हशीच्या दूधाचे दर सध्या स्थिर राहतील.

या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर गोकुळ दूध संघाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, बाजारातील वाढते इंधन दर, कच्च्या मालाच्या किमती, वाहतूक खर्च आणि पॅकेजिंग साहित्यासाठी लागणा-या खर्चात वाढ झाली आहे. शिवाय उकाड्याने आणि चाऱ्याच्या टंचाईमुळे दूध संकलनात घट झाली आहे. याआधी २१ फेब्रुवारी रोजी गोकुळने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी खरेदी दरात वाढ केली होती. मात्र त्याचा भार ग्राहकांवर टाकला नव्हता.

देशातील इतर आघाडीच्या दूध ब्रँड्सनी देखील किमती वाढवून ग्राहकांच्या खिशाला कात्री लावली आहे. यामध्ये अमूल आणि मदर डेअरी या दोन्ही मोठ्या ब्रँड्सनी १४ मे २०२६ पासून देशभरात आपल्या सर्व प्रकारच्या दुधाच्या किमतीत प्रतिलिटर २ रुपयांची वाढ लागू केली आहे. ज्यामुळे अमूल गोल्ड ७० रुपये तर मदर डेअरी फुल क्रीम दूध ७२ रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे.

SPOT NEWS

## नेप्तीत भारतीय डाक विभागाच्या आधार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
नगर तालुक्यातील नेप्ती येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय डाक विभागाच्या वतीने अहिल्यानगर आर. एस. केडगाव पोस्ट ऑफिसमार्फत आयोजित करण्यात आलेल्या विशेष आधार नोंदणी व अद्ययावत सेवा शिबिर उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाले. प्रवर अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आधार सेवांचा लाभ घेतला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. शिबिरामध्ये लहान बालकांची नवीन आधार नोंदणी, पाच वर्षे पूर्ण झालेल्या बालकांचे बायोमेट्रिक अद्ययावतीकरण, आधार कार्डशी मोबाईल क्रमांक संलग्न करणे तसेच नाव, पत्ता, जन्मतारीख, छायाचित्र आणि इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती व अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांच्या आधार संदर्भातील तक्रारी आणि अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात जाऊन आधार सेवा घेण्याची गरज भासू नये, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता व वेळेचे नियोजन यावर भर द्या

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । राज्य परिवहन महामंडळ आगार व न्यायालय इमारत बांधकामांची पाहणी**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
पारनेर येथील राज्य परिवहन महामंडळ आगार इमारत तसेच नवीन न्यायालय इमारतीच्या बांधकामांची राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. कामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता व वेळेचे नियोजन यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.



पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या आगार बांधकामाची पाहणी करून प्रवाशांसाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात एस.टी. सेवेवर अवलंबून असल्याने आगार परिसर स्वच्छ, सुरक्षित व सुविधायुक्त असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांसाठी स्वतंत्र विशेष कक्ष तसेच हिरकणी कक्ष उभारण्यात यावेत. प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. ऊर्जा बचतीच्या दृष्टीने आगारासाठी सौर ऊर्जेचा प्राधान्याने वापर करण्यात यावा. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा वापर महत्त्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी पारनेर व सुपा आगार बीओटी प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रवासी सुविधा, बस स्थानक परिसर विकास, वाहतूक नियोजन तसेच भविष्यातील गरजांनुसार सुविधा उभारण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली.

त्यानंतर पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पारनेर येथे सुरू असलेल्या नवीन न्यायालय इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. बांधकामे दर्जेदार पद्धतीने आणि निश्चित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## शनि अमावस्यानिमित्त विजय हनुमान मंदिरात आंबा महोत्सव उत्साहात

**दक्षिणमुखी मारुतीला केशर आंब्यांचा प्रसाद अर्पण । भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग**

**● पाथर्डी । वीरभूमी–**
दर्श शनि अमावस्या व शनि जयंतीच्या पर्वणीनिमित्त पाथर्डी येथील विजय हनुमान मंदिर अर्थात पोळा मारुती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त दक्षिणमुखी मारुतीच्या गाभाऱ्यात भाविकांच्या सहभागातून आंबा फळांच्या सहाय्याने आकर्षक सजावट करण्यात आली असून बजरंग बलीला आंब्याचा विशेष प्रसाद अर्पण करण्यात आला.

देवस्थान समितीतर्फे यंदा प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या आंबा महोत्सवाचे भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. शहराचे जागृत ग्रामदैवत म्हणून ओळख असलेल्या विजय हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार लोकसहभागातून कोट्यवधी रुपये खर्चून पूर्ण करण्यात आला आहे. मंदिर ट्रस्टच्या कार्यामुळे शहरातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक सकारात्मक झाले असून तरुणाईचाही सेवा कार्यात विशेष सहभाग दिसून येत आहे.

दक्षिणमुखी मारुतीची उपासना विविध दोष निवारणासाठी प्रभावी मानली जाते. शनि अमावस्या आणि शनि जयंती एकाच दिवशी आल्याने सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दिवसभर भाविकांना आमरस, बुंदी आदी



प्रसादाचे वाटप करण्यात आले. आंबा महोत्सवानिमित्त अनेक भाविकांनी मंदिरात आंब्यांचे अर्पण केले.

या दिवशी मंदिरात ध्वज अर्पण करून विधीवत पूजा केल्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख कामांतील अडथळे व विघ्ने दूर होऊन कार्यसिद्धी मिळते, अशी श्रद्धा उपासकांमध्ये असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आंबा फळांच्या सजावटीमुळे व विशेष पूजाविधीनंतर संपूर्ण गाभाऱ्यात भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. विश्वस्त मंडळाचे सदस्य, तरुण कार्यकर्ते आणि नियमित भाविक सेवाभावी वृत्तीने मंदिरात सेवा देत आहेत.

पर्वणीनिमित्त विशेष अभिषेक पूजा, सामूहिक हनुमान चालीसा पठण, अभंग व भक्तिगीतांचे सादरीकरण करण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तालासुरात सादर केलेला हनुमान चालीसा पाठ व भक्तिगीते अत्यंत श्रवणीय ठरल्याने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

पाथर्डी तालुक्यातील प्रसिद्ध केशर आंब्यांचे अर्पण करून भाविकांनी बजरंग बलीप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी विश्वस्त मंडळ सातत्याने कार्यरत असल्याने शहरवासीयांनीही मंदिराच्या कार्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे.

## निळवंडेच्या पाण्याने कोपरगाव तालुक्यातील पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरून द्या

**आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना**

**● कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यात उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता निळवंडे पाटपण्यामधून तालुक्यातील सर्व पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्याकडे करण्यात आली. यासंदर्भात वेस सोयगाव, अंजनापूर, बहदराबाद, बहादरपूर, मनेगाव, डांगेवाडी आदी गावांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात निळवंडे धरणातील उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून परिसरातील सर्व पाझर तलाव भरल्यास भूजल पातळीत मोठी वाढ होईल, विहिरींना पाणी उपलब्ध राहील तसेच जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटेल, असे नमूद करण्यात आले. उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये टंचाईची परिस्थिती निर्माण होत असल्याने प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीची तात्काळ दखल घेत आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. हापसे साहेब यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला.

नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईचा त्रास होऊ नये यासाठी हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच पंचक्रोशीतील सर्व पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही त्वरीत सुरू करण्याचे निर्देशही दिले.

यावर कार्यकारी अभियंता श्री. हापसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित मागणीवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी नानासाहेब गव्हाणे, भीमराव गुंजाळ, बाबासाहेब नेहे, रामदास भडांगे, राजेंद्र कोल्हे, बाळासाहेब काकडे, नितीन पाचोरे, सुरेश पाडेकर, कैलास रहाणे आदी उपस्थित होते.

# भविष्याचा वेध घेत सुपा गावासाठी युती शासनाकडून भरघोस निधी

**ना. राधाकृष्ण विखे पाटील । सुपा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण**

**● पारनेर । वीरभूमी–**
सुपा शहरात पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते यांच्या पुढाकारातून तालुक्यातील विविध ठिकाणी विकासकामांच्या कार्यक्रमांचे नियोजन महायुतीच्या पदाधिकाऱ्यांमार्फत करण्यात आले होते. या दौऱ्याची सुरुवात सुपा गावातील विकासकामांच्या भूमिपूजनापासून झाली.

दौऱ्यादरम्यान सर्वप्रथम सागर भास्करराव मैड यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेल्या सुपा गावातील भव्य 'अटल वन उद्यान' प्रकल्पास नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देत कामाची पाहणी केली.

यानंतर सुपा येथील शिवतीर्थ चौकात आमदार काशिनाथ दाते यांच्या निधीतून मंजूर झालेल्या ४० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. शिवतीर्थ चौकाचे सुशोभीकरण पर्यटन विभागाच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच, आमदार दाते यांच्या निधीतून पूर्ण झालेल्या तीन रस्त्यांच्या कामांचे लोकार्पणही नामदार विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुपा गावासाठी शासनाकडून सातत्याने भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची आठवण करून दिली.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य सरचिटणीस विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, वसंत चेडे, युवराज पाटील, अमोल मैड, दिलीप दाते, सुभाष दुधाडे, योगेश रोकडे, दत्ता नाना पवार, मनोज मुंगसे, सुनील पवार, मधुकर पठारे, दत्तात्रय रोकडे, सुषमा रावडे, अश्विनी थोरात, कवाद मॅडम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुपा परिसरात आपल्या अभ्यासू आणि लोकाभिमुख कामामुळे कामाचा माणूस अशी ओळख निर्माण केलेले सागर भास्करराव मैड यांच्यावर महिनाभरापूर्वी मणक्याच्या त्रासामुळे तातडीची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. सध्या त्यांच्यावर फिजिओथेरपीद्वारे उपचार सुरू आहेत.

कार्यक्रमादरम्यान सागर मैड यांची अनुपस्थिती लक्षात येताच नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी दाते यांनी मैड यांच्या



प्रकृतीबाबत माहिती दिली. ही माहिती मिळताच नामदार विखे पाटील यांनी तत्काळ सागर मैड यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली.

यावेळी त्यांनी सागर मैड यांच्या प्रकृतीची विचारपूस करत पुढील चार ते सहा महिने सक्तीने आराम करण्याचा सल्ला दिला. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे नेतृत्व म्हणून नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते यांनी नेहमीच कार्यकर्त्यांना आधार दिल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

अशा आत्मीय भेटींमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होते आणि संघर्षाला सामोरे जाण्याची नवी ऊर्जा मिळते, याचा प्रत्यय या भेटीतून पुन्हा एकदा आला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## डॉ. भाऊसाहेब नरसाळे यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. प्रदान

**● पारनेर । वीरभूमी–**

पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासासाठी 'हरित रसायनशास्त्र' ही काळाची गरज बनली आहे. याच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. भाऊसाहेब नरसाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत रसायनशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान केली आहे. डॉ. भाऊसाहेब नरसाळे यांनी बहुघटक रूपांतरणामध्ये जैवपॉलिमर–आधारित उत्प्रेरकांचा उपयोग या विषयावर संशोधन पूर्ण केले. त्यांनी 'झँथन' या नैसर्गिक जैवपॉलिमरचा वापर करून रासायनिक अभिक्रिया जलद करण्यासाठी आवश्यक उत्प्रेरक विकसित केले आहेत. या संशोधनासाठी त्यांना न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. डॉ. दिलीप ठुबे आणि प्रा. डॉ. अनिल गाढवे यांचे मार्गदर्शन लाभले. संशोधनासाठी न्यू आर्टस् महाविद्यालय, पारनेर यांच्यासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा रसायनशास्त्र विभाग, पदार्थविज्ञान विभाग, पुण्यातील आबेदा इनामदार सिनियर कॉलेज तसेच पंजाब येथील 'सालिफ' या नामांकित संस्थांची तांत्रिक मदत मिळाली. पारंपरिक रासायनिक प्रक्रियांमध्ये वापरले जाणारे उत्प्रेरक अनेकदा महागडे आणि पर्यावरणास घातक ठरतात. मात्र, डॉ. नरसाळे यांनी विकसित केलेले उत्प्रेरक अनेक कारणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहेत. हे उत्प्रेरक पूर्णपणे नैसर्गिक स्रोतांपासून तयार करण्यात आले असून ते पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त आहेत. वापरानंतर ते पुन्हा मिळवून पुनर्वापर करता येतात, त्यामुळे खर्चात मोठी बचत होते. तसेच या तंत्रज्ञानामुळे रासायनिक संयुगांची निर्मिती अधिक सुरक्षित, जलद आणि कमी ऊर्जेत करणे शक्य झाले आहे. डॉ. नरसाळे यांच्या संशोधनाचा सर्वाधिक फायदा औषधनिर्मिती क्षेत्राला होणार असल्याचे मानले जात आहे. कमी वेळेत आणि उच्च गुणवत्तेची औषधी संयुगे तयार करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. याशिवाय कृषी रसायने, जैवतंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रातही या संशोधनाचा मोठ्या प्रमाणावर वापर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नामदेवराव शिंदे यांचे निधन

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



मढेवडगावच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जडणघडणीत अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने योगदान देणारे व श्रीगोंदा कारखान्याचे माजी प्रथम अध्यक्ष कै. खासेराव (काका) वाबळे, श्रीगोंदा तालुक्याचे भाग्यविधाते कै. शिवाजीराव (बापू) नागवडे व माजी सरपंच कै. नामदेवराव (अण्णा) उंडे यांचे अत्यंत विश्वासू, निष्ठावान व जिवाभावाचे सहकारी म्हणून ओळख असलेले मढेवडगाव सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष व श्रीगोंदा कारखान्याचे माजी संचालक कै. नामदेवराव (तात्या) शिंदे (वय ८४ वर्षे) यांचे शनिवार दि. १६ मे रोजी सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. तात्यांनी आयुष्यभर समाजहित, माणुसकी आणि गावाच्या विकासाला प्राधान्य देत अनेकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले. त्यांचा साधेपणा, प्रामाणिकपणा, कार्यकर्त्यांवरील प्रेम आणि गावाशी असलेली नाळ कायम स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने मढेवडगावच्या सामाजिक जीवनातील एक प्रेमळ, विश्वासू आणि कर्तृत्ववान नेतृत्व हरपले आहे. विद्यमान लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे यांचे ते वडील होत. त्यांच्या पाठीमागे सहा मुली, एक मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वर्षभर नागरिकांसाठी प्रामाणिकपणे काम करा

**आ.आशुतोष काळे यांच्या अधिकाऱ्यांना सुचना । कोपरगावातील महाराजस्व समाधान शिबिराला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**● कोपरगाव । वीरभूमी–**



गाव–खेड्यातील नागरिकांच्या प्रशासकीय कामांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी मंडळ स्तरावर महायुती शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान हाती घेतले आहे. आज कागदपत्र जमा करून जर नंतर दाखले दिले जाणार असेल तर या शिबिराचा काही उपयोग होणार नाही. या शिबिराच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न जागेवरच मार्गी लागले पाहिजे तरच या अभियानाचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल होणार आहे. त्यासाठी महाराजस्व समाधान शिबिराचा जास्तीत जास्त नागरीकांना लाभ कसा करून देता येईल याची काळजी घ्या आणि फक्त समाधान शिबिराच्या दिवशीच नाही तर वर्षभर प्रामाणिकपणे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहे.

तहसील कार्यालयाच्या वतीने कलश मंगल कार्यालय कोपरगाव येथे शनिवार (दि.१६) रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार महेश सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते पार पडले यावेळी मान्यवरांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले कि, महायुती शासन नागरिकांसाठी अनेक लोककल्याणकारी योजना राबवत आहे. या योजना नागरिकांपर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून सर्वच योजना पात्र गरजू लाभार्थ्यांपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी काम करणे गरजेचे आहे. नागरीकांना वारंवार शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावू नका. शहराप्रमाणे ग्रामीण भागातील नागरिकांना देखील जलद सेवा द्या. गाव पातळीच्या अधिकाऱ्यांवर अधिक जबाबदाऱ्या असल्या तरी नागरिकांची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा.कोपरगाव तालुक्यात सर्वात जास्त बांधावरच्या रस्त्याचे प्रश्न सोडविल्याबद्दल महसूल विभागाचे त्यांनी कौतुक केले. आणि यापुढे अधिक सक्रीय राहून या शिबिराच्या माध्यमातून बांधावरचे भांडण बांधावर कसे सोडवता येतील आणि शेत रस्त्यांचे प्रश्न कसे मार्गी लावता येतील यासाठी प्रयत्न करा. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचला तरच हे अभियान यशस्वी होणार आहे याचे भान ठेवा असे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ तसेच आवश्यक दाखल्यांचे वाटप करण्यात आले. शिबीरस्थळी महिला बचत गटांनी उभारलेल्या विविध उत्पादनांच्या व व्यवसायाच्या स्टॉल्सना आमदार आशुतोष काळे यांनी भेट देत महिलांशी संवाद साधला.

याप्रसंगी विधानपरिषद आमदार विवेक कोल्हे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक दिनार कुदळे,दिलीपराव बोरनारे, श्रावण आसने, शंकरराव चव्हाण, विष्णू शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, नगरसेवक मंदार पहाडे, हाजीमेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, वाल्मिक लहिरे, सोमनाथ आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, फकीर कुरेशी, अजीज शेख, सचिन गवारे, सुनिल फंड, गणेश बोरुडे, चंद्रशेखर म्हस्के, अशोक आव्हाटे, संतोष शेलार, मुकुंद भूतडा, नितीन बोरुडे, आकाश डागा, जावेद शेख, सचिन परदेशी, राजेंद्र खैरनार, दादा पोटे, ठकाजी लासुरे, राजेंद्र आभाळे, प्रदीप कुऱ्हाडे, भाऊसाहेब भाबड, तन्मय साबळे, प्रकाश रुईकर, विशाल राऊत, बायजीत पठाण, बाळासाहेब शिंदे, रविंद्र राऊत, विनोद गलांडे, राजेंद्र तिरसे, सिद्धार्थ शेळके, हर्षल कृष्णानी, महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## श्री सद्गुरु गंगागीर महाराज महाविद्यालय कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये २३ विद्यार्थ्यांची निवड

**● कोपरगाव । वीरभूमी–**

**सॉफ्टवेअर डेव्हलपर्स व बिझनेस डेव्हलपमेंट पदांसाठी संधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथे करिअर काउन्सेलिंग अँड प्लेसमेंट सेल तसेच आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने डीींळींळलीं.लो यांच्या सहकार्याने आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये विविध पदांसाठी २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी दिली.

या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर्स पदासाठी ४ विद्यार्थ्यांची, तर बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट्स पदासाठी १९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. माधव सरोदे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करत असून, भविष्यातही अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच त्यांनी नियुक्त विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हाइस चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अ‍ॅड. संदीप वर्पे, महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या मा. सौ. चैतालीताई काळे, मा. आमदार विवेक कोल्हे, मा. श्री. सुनील गंगुले, मा. श्री. बाळासाहेब आव्हाड, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दिलीप भोये, कार्यालय अधीक्षक श्री. सुनील गोसावी तसेच सर्व विभागप्रमुखांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## काळे परिवाराच्या स्वामी सेवेचे प.पु. गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांचेकडून कौतुक

**● कोपरगाव । वीरभूमी–**



आ. आशुतोष काळे यांनी स्वामी सेवेचा वारसा पुढे चालवत ठेवला असून त्यांच्या रूपाने काळे कुटुंबाची तिसरी पिढी स्वामी सेवेचे कार्य करीत आहे. आहे. आम्ही कोळपेवाडी कारखाना कार्यस्थळावर गेल्या ४० वर्षांपासून अनेक नाम साप्ताह केले आहेत. मा.खा.स्व,कर्मवीर शंकररावजी काळे, स्व.सौ.सुशीलामाई काळे, माजी आमदार अशोकराव काळे यांनी स्वामी सेवा केली आहे. आणि आजही कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावरील श्री विष्णू मंदिरात श्री स्वामी समर्थ केंद्रात स्वामींची सेवा सुरु असल्याने सांगत प. पु. गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांनी काळे कुटुंबाचे कौतुक केले.

कोपरगाव तालुक्यातील कारवाडी येथील स्वामी समर्थ सेवेकरी संतोषभाऊ जाधव यांच्या संकल्पनेतून कोपरगाव तालुक्यातील कारवाडी–शहा येथे दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या नूतन वास्तूचा लोकार्पण आणि वास्तुशांती सोहळा शुक्रवार (दि.१५) रोजी प. पु. मोरेदादा यांच्या हस्ते पार पडला यावेळी ते बोलत होते. या सोहळ्याच्या निमित्ताने श्री स्वामी समर्थ कथा, अखंड नामजप यज्ञ आणि श्री गुरुचरित्र पारायण व अन्नदान करण्यात आले.

या सोहळ्या प्रसंगी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित राहून श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले तसेच संत–महंतांचे आशीर्वाद घेतले. या प्रसंगी बोलताना आ.आशुतोष काळे यांनी शहा–कारवाडी आणि कोपरगाव तालुका हा अतिशय धार्मिक परिसर असून आमचे काळे कुटुंबीय देखील धार्मिक आहे. कारखाना कार्यस्थळावरील व परिसरातील नागरिकांना स्वामी सेवा करता यावी याकरिता प.पु. मोरेदादा यांच्या मार्गदर्शनाखाली मा.खा. स्व. कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी कारखाना कार्यस्थळावर श्री स्वामी समर्थ केंद्राची स्थापना केली आहे.केंद्र प्रमुख संतोषभाऊ जाधव हे प्रवचन सेवा देवून मोठे धार्मिक काम करीत आहे. कारवाडी येथील श्री स्वामी समर्थ केंद्र हे दिंडोरी प्रणित सेवा मार्गातील एक महत्त्वाचे आणि मोठे केंद्र म्हणून ओळखले जाते. नाशिक आणि अहिल्यानगर या दोन्ही जिल्ह्यांतील हजारो भाविक या केंद्राशी जोडलेले आहेत येथील धार्मिक आणि प्रसन्न वातावरण पाहता यापुढेही भाविकांची संख्या अधिक वाढणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी परमपूज्य गुरुवर्य श्री रमेशगिरीजी महाराज, परमपूज्य श्री महामंडलेश्वर परमहंस स्वामी काशीकानंदजी महाराज, परमपूज्य श्री राघवेश्वरानंदगिरीजी महाराज, सुरेश चव्हाणके, माजी मंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे यांच्यासह संत–महंत, विविध क्षेत्रातील मान्यवर, सेवेकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी सरकारला कांदा विकू नये : अनिल घनवट



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला दर देण्याच्या नावाखाली केंद्र सरकार बफर स्टॉकसाठी कांदा खरेदी करत असून, भविष्यात कांद्याचे दर वाढल्यानंतर ते नियंत्रित करण्यासाठीच ही खरेदी केली जात असल्याचा आरोप स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा शेतकरी नेते अनिल घनवट यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नाफेड किंवा एनसीसीएफला कांदा विकू नये, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की केंद्र शासनाने दोन लाख टन कांदा खरेदी करण्याची घोषणा केली असून, महाराष्ट्रात १२३५ रुपये प्रतिक्विंटल दराने ही खरेदी होणार आहे. शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, या उद्देशाने खरेदी केली जात असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात भविष्यात कांद्याचे दर वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन बाजारभाव नियंत्रणासाठी हा बफर स्टॉक उभारला जात असल्याचे घनवट यांनी म्हटले आहे.

एका क्विंटल कांदा उत्पादनासाठी शेतकऱ्यांना किमान दोन हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. त्यात साठवणुकीसाठी प्रतिकिलो पाच रुपयांचा अतिरिक्त खर्च होतो. असे असताना निर्यातक्षम दर्जाचा कांदा अवघ्या १२३५ रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करून शेतकऱ्यांचे नुकसान केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

भविष्यात दर वाढल्यास हाच कांदा बाजारात आणून दर पाडले जातील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. नाफेड व एनसीसीएफमार्फत होणाऱ्या खरेदी प्रक्रियेत गैरप्रकार होण्याची शक्यता असल्याचा आरोप करताना घनवट म्हणाले, की खुल्या बाजारात दर वाढल्यानंतर उत्तम दर्जाचा कांदा व्यापाऱ्यांना विकून त्याऐवजी निकृष्ट दर्जाचा कांदा सरकारला दिला जातो. काही वेळा प्रत्यक्ष खरेदी न करताही केवळ कागदोपत्री व्यवहार दाखवून आर्थिक गैरव्यवहार होतात. या प्रक्रियेत काही अधिकारी, व्यापारी, पुढारी व इतर संबंधितांचा सहभाग असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कांद्याला सध्या दर नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी कांदा साठवून ठेवला आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे कांदा खराब होण्याची शक्यता वाढली असून, साठवणुकीचा खर्चही वाढत आहे. पुढील काही महिन्यांत कांद्याचे दर वाढण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी सध्या सरकारला कांदा विकू नये आणि सरकारी खरेदीवर बहिष्कार टाकावा, असे आवाहन अनिल घनवट यांनी केले आहे. तसेच सरकारने कांदा खरेदीचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाने मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# अधिकाऱ्यांनी पाणी, चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन करावे

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । पारनेर येथे तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठक संपन्न

**अहिल्यानगर । वीरभूमी –** पारनेर तालुक्यातील नागरिकांना मुबलक प्रमाणात शुद्ध पिण्याचे पाणी तसेच पशुधनासाठी पुरेसे पाणी व चारा उपलब्ध होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. टंचाई निवारणात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांप्रती संवेदनशीलता ठेवून काम करावे, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पारनेर येथे टंचाई परिस्थितीबाबत आयोजित तालुकास्तरीय शासकीय योजनांच्या अंमलबजावणी आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर तसेच जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, टंचाईच्या काळात नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील कोणत्याही गावात पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे. नागरिकांची गैरसोय व त्रास टाळण्यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी. टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी पंचायत समिती स्तरावर वेळापत्रक निश्चित करून त्याप्रमाणे समन्यायाने पाणी वाटप करावे. तलाठी व ग्रामसेवकांनी पाणी वाटपाच्या वेळी गावात उपस्थित राहावे. तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांनी पाणी वाटपावर बारकाईने लक्ष ठेवावे, असेही त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील अडथळे तातडीने दूर करण्यात यावेत. येत्या दोन–तीन दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करून सदर योजना कार्यान्वित करण्यात याव्यात. तालुक्यातील १६ गावांसाठी असलेल्या पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा तातडीने सुरू करून योजना कार्यान्वित करावी. तसेच कुकडी कालव्यातून तातडीने पाणी सोडण्याच्या सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.




शेतकरी, नागरिक व पशुधनाच्या गरजांचा विचार करून पाण्याचे प्रभावी नियोजन करण्यात यावे. पाणीप्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने अधिक समन्वयाने कार्य करावे. औद्योगिक वसाहतीतील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध होण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तातडीने निर्णय घ्यावेत. उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्राधान्य द्यावे, अशा सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिल्या. बैठकीस लोकप्रतिनिधी व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# निळवंडे धरणाचे आवर्तन सुरळीतपणे सुरु असून सर्व पाझर तलाव, साठवण बंधारे भरून द्यावेत

## आमदार आशुतोष काळेंची पालकमंत्र्याकडे मागणी

**कोपरगाव । वीरभूमी–** निळवंडे कालव्यांना आवर्तन सोडण्यात आले असून कोपरगाव तालुक्यात तळेगाव शाखा कालव्यातून वडझरी पॉइंट, बोडखेवाडी पॉइंट व शेख वस्ती पॉइंटमधून आवर्तन सुरळीतपणे सुरु आहे. त्यामुळे जिरायती भागातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. निळवंडेचे पाणी अंजनापूर गावापर्यंत पाणी आले आहे. वडझिर पॉइंट मधून डांगेवाडी बंधाऱ्यात पाणी सुरु आहे ते पुढे वेस, सोयगाव, बहादराबाद पर्यंत येणार आहे.त्यामुळे सुरु असलेल्या आवर्तनातून कोपरगाव मतदार संघातील सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दयाव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे



जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्याकडे टंचाई आढावा बैठकीत केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई व मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील इतर लोकप्रतिनिधींबरोबरच आमदार आशुतोष काळे हे देखील दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले की, चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात असली तरी गोदावरी कालव्यांचे तसेच निळवंडेचे आवर्तन सुरु असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अडचणी नाही. जिरायती भागातील नागरिकांना निळवंडे आवर्तनाचा मोठा लाभ झाला आहे. परंतु हवामान विभागाने चालू वर्षी पर्जन्यमान कमी होणार असल्याचा अंदाज वर्तवला असून पाऊस सुरु होण्यास अजून अवधी आहे.

त्यामुळे सुरु असलेल्या निळवंडेच्या आवर्तनातून कोपरगाव मतदार संघाच्या जिरायती भागातील सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरल्यास जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत अडचणी येणार नाहीत. त्यामुळे सुरु असलेल्या आवर्तनातून पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दयाव्यात या आमदार आशुतोष काळे यांच्या मागणीला राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. त्यामुळे कोपरगाव मतदार संघाच्या जिरायती भागातील नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

# जलसंपदा मंत्र्यांच्या आदेशाने २५ मे पासून कुकडीचे दुसरे आवर्तन : आ. विक्रम पाचपुते

**श्रीगोंदा । वीरभूमी–** 'एल निनो'च्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कुकडी प्रकल्पातून उन्हाळी दुसरे आवर्तन सुटण्याबाबत अनिश्चितता होती. मात्र, श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून २५ मे २०२६ रोजी कुकडी धरणातून दुसरे आवर्तन सोडण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आ. पाचपुते यांनी दिली.

या निर्णयामुळे श्रीगोंदा तालुक्यातील कुकडी लाभक्षेत्रातील शेतीपिकांना तसेच पिण्याच्या पाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या कुकडी प्रकल्पातील धरणांमध्ये केवळ १७.६७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असतानाही



शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

आ. विक्रम पाचपुते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, कडक उन्हाळा, वाढती टंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी वारंवार शासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत मुख्यमंत्री यांच्याशी समन्वय साधला आणि आवर्तन मंजूर करण्यात आले.

यावेळी आ. पाचपुते यांनी मुख्यमंत्री तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले. तसेच घोड प्रकल्पाच्या आवर्तनाचेही योग्य नियोजन झाल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, पाणीसाठा मर्यादित असल्याने शेतकऱ्यांनी आवर्तनाचे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, असे आवाहनही आ. पाचपुते यांनी केले.

# अब काम का दौर आयेगा; आ. विवेक कोल्हे यांच्या वक्तव्याने प्रशासनात नवी ऊर्जा

## जनतेचे प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने वेगाने काम करावे । समन्वयातून विकासाला गती देण्याचे आवाहन

**कोपरगाव । वीरभूमी–** पूर्वी सत्तेत नसतानाही जनतेच्या प्रश्नांसाठी समस्या निवारण बैठका घेत परखड भूमिका मांडली. मात्र आता विधानपरिषदेनंतर तालुक्यात नव्या ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले असून दुप्पट वेगाने विकासकामे होतील, असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम केल्यास सर्वसामान्यांचे प्रश्न जलदगतीने मार्गी लागू शकतात. त्यासाठी प्रशासनाने अधिक वेगाने काम करण्याची क्षमता ठेवावी, असे प्रतिपादन आ. विवेकभैय्या कोल्हे यांनी केले.

कोपरगाव शहरातील कलश मंगल कार्यालय येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या अभियानात सर्व विभागांनी सक्रिय सहभाग घेतल्यास मोठ्या प्रमाणात जनतेचे प्रश्न सुटतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. खंडकरी शेतकऱ्यांना जमीन मिळवून देण्यासाठी माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी मोठा संघर्ष उभारला होता. कोकमठाण येथील खंडकरी शेतकरी लोहकने कुटुंबांचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून त्यातील विलंब दूर करून हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच शिंगणापूर जलजीवन मिशन योजनेचे काम नाहक विलंबित झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची जाणीव करून देत सदर प्रश्न जलदगतीने सोडविण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. वीज, पाणी आणि नागरिकांचे मूलभूत महसुली प्रश्न प्राधान्याने निकाली काढावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासन हे जनतेच्या दारी जाऊन प्रश्न सोडवणारे असले पाहिजे, असा विश्वास कोपरगाव शहर व तालुक्याने प्रशासनावर व्यक्त केला आहे. त्यामुळे अधिक जबाबदारीने आणि प्रभावीपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी प्रशासनाचा आदर्श पुढे ठेवला. वतनदारीऐवजी वेतनदारी पद्धती, जलव्यवस्थापन, सैन्यासाठी मदत योजना तसेच जमीन मोजणीसारखे दूरदृष्टीचे निर्णय शिवकाळात झाले होते. आजच्या प्रशासनानेही त्यातून प्रेरणा घेऊन नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

शासकीय यंत्रणेने सामोपचाराने काम करावे; मात्र जनतेची कामे अडली तर आम्हाला परखड भूमिका घ्यावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

*''अब काम का दौर आयेगा,*
*जो बैठे थे खामोश उनको भी*
*काम याद आयेगा...''*

हा खुमासदार शेर सादर करताच सभागृहात तसेच अधिकारी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, डोमिसाईल प्रमाणपत्र, वारसनोंदी, स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात अनुदान, संजय गांधी निराधार योजनेचे दाखले, दिव्यांग प्रमाणपत्रे,



ऑनलाइन हयातीचे दाखले तसेच विविध महसुली कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. नागरिकांच्या अडचणी तत्काळ सोडवून त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे, कोपरगाव नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते, भूमी अभिलेख अधीक्षक रवींद्र खरोटे, निवासी नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहम, शेतकरी अभिजीत आव्हाड तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.